# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०७३ /२०१०

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | : | श्री महेंद्र सुदर्शन नाहारकर<br>राहणार पाचपावली, ठक्करग्राम,<br>स्विपर कॉलनी,<br>नागपूर. |
| | | – विरूध्द – |
| गैरअर्जदार | : | कार्यकारी अभियंता,<br>गांधिबाग विभाग,<br>म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,<br>नागपुर. |
| गणपुर्ती | : | १) श्रीमती के.के घरत,<br>सदस्य–सचिव<br><br>२) ॲड. श्रीमती गौरी चांद्रायण,<br>सदस्या |

–– अतंरिम आदेश ––

पारीत दि. १९.१०.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक १४.१०.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ८.३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री. महेद्र सुदर्शन नाहारकर अर्जदार, राहणार पाचपावली, ठक्करग्राम, स्विपर कॉलनी, नागपूर यांनी म.रा.वि.वि.कं. मर्यादित यांचे ग्राहक श्रीमती. रूक्कोबाई एस. नाहारकर यांच्या तर्फे विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या नोटीस विरूध्द अंतरिम आदेश पारित करण्याबाबत १४.१०.२०१० रोजी मंचात अर्ज दाखल केला आहे.

२. दिनांक १६.१०.२०१० रोजी मंचात अंतरिम आदेशा करीता सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे, श्री. गडकर, उपकार्यकारी अभियंता, बिनाकी उपविभाग, हे उपस्थित होते.

श्री. महेंद्र सुदर्शन नाहारकर, यांनी अर्जदाराची बाजु मांडताना सांगितले की त्यांना गैरअर्जदारातर्फे मीटर वाचनानुसार विद्युत देयक देण्यात आले नाही. तसेच एप्रिल, मे व जुन २०१० मध्ये, त्यांना विद्युत देयकं मिळाले नाही. जुलै व सप्टेंबर २०१० मध्ये मीटरचा फोटो न घेता विद्युत देयक पाठविण्यात आले. ही सर्व माहीती संबंधीत उपकार्यकारी अभियंता, बिनाकी उपविभाग, यांना वारंवार कळवुन सुध्दा कुठलीही कार्यवाही झाली नाही व विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस पाठवुन, अर्जदाराला विद्युत पुरवठा खंडीत करण्याची धमकी देण्यात येत आहे, ज्यामुळे त्यांना मानसिक त्रास होतो आहे. मीटर वाचनानुसार देयक देवुन त्यांच्या समस्येचे निराकरण करावें व विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस रदद् करावी अशी विनंती अर्जदाराने मंचाला केली.

३. गैरअर्जदाराने आपले स्पष्टीकरण मंचात दाखल केले व सांगितले की ठक्करग्राम, स्विपर कॉलनी या भागात काही वेळा मीटरचे वाचन करण्याकरीता ग्राहक मज्जाव करतात व मीटरचे वाचन करू देत

नाही. फक्त अशा परिस्थितीतच ग्राहकाला ‘कुलूप बंद’ किंवा ‘मीटरवाचन उपलब्ध नाही’ असे शेरे असलेले विद्युत देयक देण्यात येते. पंरतु इतर परिस्थितीमध्ये ग्राहकांना मीटर वाचनाचे देयक पाठविण्यात येते.

त्यांनी पुढे मंचाला सांगितले की अर्जदाराने विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस मिळाल्यानंतर, पहिल्यांदा १२.१०.२०१० रोजी, विद्युत देयक न मिळाल्याबाबत कार्यालयात तक्रार अर्ज दाखल केला आहे. यापुर्वी त्यांनी कुठल्याही प्रकारची तक्रार केली नाही. तसेच मार्च २०१० नंतर अर्जदाराने विद्युत देयक भरणा केले नाही. काही महिने वगळता बहुतांश महिन्यात त्यांना मीटर वाचनाचे विद्युत देयक मिळाले आहे. तरीही त्यांनी भरणा केला नाही. त्यामुळे मा. महाराष्ट्र विज नियामक आयोग यांच्या व्दारा पारित विनिमयाचे पालन करून थकबाकीसाठी विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस अर्जदाराला देण्यात आली आहे व सदर देयक भरणा करणे अर्जदारास बंधनकारक आहे. त्यामुळे अर्जदाराचा तक्रार अर्ज खारीज करण्याची विनंती गैरअर्जदाराने मंचाला केली आहे.

४. मंचाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. अर्जदाराला वेळेवर विद्युत देयक न मिळाल्यामुळे, त्यांनी ते भरणा केले नाही. आणि मीटर वाचनानुसार अर्जदाराला विद्युत देयक प्राप्त होत नाही अशी अर्जदाराचे तक्रार आहे. पंरतु सी.पी.एल. बघता मंचाला असे लक्षात आले की काही महिने वगळता बहुतांश महिन्यात मीटरवाचनानुसार देयक देण्यात आले आहे. त्यामुळे मीटर वाचनानुसार देयक प्राप्त होत नाही असे अर्जदाराचे म्हणणे मंचाला मान्य नाही

तसेच अर्जदाराने सुनावणीच्या वेळेस स्वतः मान्य केले की गैरअर्जदाराच्या कार्यालयास जेव्हा त्यांनी देयकाची मागणी केली होती. तेव्हा संगणकामार्फत गैरअर्जदाराने काढलेले देयक त्यांना मान्य नव्हते. अर्जदारानुसार ते देयक त्यांना वाढीव असल्याचे जाणवले व

त्यामुळे त्यांनी ते स्विकारले नाही. परंतु सी.पी.एल. बघता बिलींग पध्दतीमध्ये मंचाला कुठलेही दोष आढळले नाही. त्यामुळे थकबाकी पोटी पुरवठा खंडीत करण्याची नोटीस रदद् करण्याकरीता अंतरिम आदेश देण्याची अर्जदाराची मागणी अमान्य करण्यात येत आहे. तसेच अर्जदारास कळविण्यात येते की त्यांनी सदर थकबाकी वेळेत भरावी.

वरील सर्व बाबींचा विचार करून मंच अंतरिम आदेश देते की,

# आदेश

१. अर्जदाराचा अंतरिम आदेश पारित करण्याबाबतचा अर्ज खारीज करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) |
| सदस्य–सचिव | सदस्या |